# स्नेह समृध्दी मंडळ

## वार्षिक अहवाल २०२३ -२०२४

# अनुक्रमणिका

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | प्रकल्प स्वयंसिध्दा |
| २ | प्रकल्प विद्या |
| ३ | प्रकल्प समर्था |
| ४ | प्रकल्प निरंतर |
| ५ | संस्था प्रतिनिधींसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, अभ्यास वर्ग व विशेष बैठकांमध्ये सहभाग |
| ६ | विशेष गुणगौरव |
| ७ | संस्था भेटी |

# “स्वयंसिध्दा”

* प्रकल्प “स्वयंसिध्दा” अंतर्गत संस्थेच्या कार्यक्षेत्रामधील महिला आधारगटांच्या दरमहा बैठका घेण्यात येतात. त्यांना अनेक विषयांचे मार्गदर्शन करण्यात येते. उदा. भांडण तंटे कसे मिटवावेत याबाबत मार्गदर्शन किंवा पिडीत व्यक्तीची मानसिकता व तिला आधार देण्याचे महत्व यावर मार्गदर्शन इ.
* संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये सन २०२३/२४ मध्ये २१ महिला आधारगट बैठका घेण्यात आल्या व त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आधारगटांतील महिलांचा खुप चांगला प्रतिसाद यासाठी मिळाला.
* संस्थेच्या समुपदेशन केंद्रामध्ये येणाऱ्या केसेसना समुपदेशन करुन व त्यांना योग्य तो सल्ला देवुन सामोपचाराने वाद-विवाद मिटविण्यात येतात.
* सन २०२३/२४ मध्ये २८ एवढया केसेसची नोंद संस्थेच्या समुपदेशन केंद्रामध्ये झाली. व त्यांना योग्य ते मागदर्शन करण्यात आले.
* महिला दक्षता समितीच्या मिटींग आणि केसेसना साक्षीदार म्हणून नयन शिंदे यांची उपस्थिती.
* संस्थेच्या प्रकल्प स्वयंसिध्दा अंतर्गत असलेल्या देवरुख होम प्रॉडक्ट या उत्पादन केद्राचा सन २०२३/२४ मध्ये १७ महिलांना रु.२३४०००/- एवढा आर्थीक मोबदला मिळाला. ज्यामुळे त्यांना त्यांच्या कुटूंबामध्ये याचा चांगला उपयोग करता आला.

# प्रकल्प “स्वयंसिध्दा” अंतर्गत महिलांच्या आधारगट बैठका

महिला आधारगटांना मार्गदर्शन करताना सौ. सुनिता माईन









देवधामापूर गटबैठक



आंबवली मराठवाडी आधारगट बैठक



मानसकोंड आधारगट बैठक



मानसकोंड महिला दिन कार्यक्रम

# प्रकल्प “स्वयंसिध्दा” अंतर्गत उत्पादन व विक्री केंद्रामध्ये विक्रीसाठी उपलब्ध असलेले खादय पदार्थ

स्नेह समृध्दी मंडळ संस्थेच्या प्रकल्प “स्वयंसिध्दा” अंतर्गत असलेल्या देवरुख होम प्रॉडक्ट्स या उत्पादन केंद्रामध्ये सन २०२३/२४ मध्ये अतिशय उत्तम प्रकारे उत्पादन व विक्री करण्यात आली. गणपती व दिवाळी हे सण नजरेसमोर ठेवून काजु मोदक, चकली, लाडू, चिवडा इ. पदार्थांना खुप चांगला प्रतिसाद मिळाला. याचा फायदा उत्पादन करणाऱ्या महिलांना झाला.






## L&T कंपनीच्या विक्री प्रदर्शन मेळाव्यामध्ये स्नेह समृध्दी मंडळाचा सहभाग

गेली ५ वर्ष L&T (पवई) मार्फत भरविण्यात येणाऱ्या मेळाव्यामध्ये आपल्या संस्थेचा सहभाग असतो. सन २०२३/२४ मध्येही ३१ ऑक्टोबर २०२३ ते १ नोव्हेंबर २०२३ असा दोन दिवसीय प्रदर्शन (मेळावा) व विक्री आयोजित केला होता. या दोन दिवसात अपेक्षेपेक्षा जास्त म्हणजे सुमारे रु.४०,०००/- एवढी उत्पादनांची विक्री झाली.






# देवरुख होम प्रॉडक्ट्स कंपनीचा वार्षिक अहवाल

| अ.क्र. | तपशिल | आर्थिक मोबदला रक्कम |
|---|---|---|
| १ | आर्थिक रोजगार | |
| | देवरुख होम प्राडक्ट्स कंपनी सन २०२३/२४ या कालावधीमध्ये सुमारे १० महिलांना आर्थिक स्वरुपात रोजगार उपलब्ध करुन दिला. | १२५०००/- |
| | **मजुरी** :- मजुरी स्वरुपात एकूण ६ महिलांना आर्थिक स्वरुपात रोजगार उपलब्ध करुन दिला. (यामध्ये, घरकाम, परिसर बाग, स्वच्छता इ. कामे) | २५०००/- |
| | **कायम स्वरुपी** :- १ महिलेला कायम स्वरुपी मासिक आर्थिक रोजगार मिळवून दिला. (दरमहा रु.७०००/- प्रमाणे) | ८४०००/- |
| | एकूण १७ महिलांना देवरुख होम प्रॉडक्ट्स च्या माध्यमातुन आर्थिक रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला. | २३४०००/- |

| अ.क्र. | तपशिल | आर्थिक मोबदला रक्कम |
| --- | --- | --- |
| २ | **नवीन उत्पादने**<br>सन २०२३/२४ या आर्थिक वर्षामध्ये देवरुख होम प्रॉडक्ट्स कंपनीमध्ये आणखी ३ नवीन सनड्रायड उत्पादनांची भर पडली १) साबुदाणा बटाटा मिरची फेणी २) साबुदाणा बटाटा मिरची चकली ३) बटाटा किस ४) काजू मोदक.<br>ही चार उत्पादने अपेक्षेपेक्षा जास्त ग्राहकांच्या पसंतीस उतरले. चाचणी (ट्रायल) म्हणून केलेली ही ४ उत्पादेने दोन महिन्यांतच संपली. झालेली विक्री पुढीलप्रमाणे⟶ | ४५०००/- |
| ३ | **मार्केटिंग सपोर्ट**<br>लार्सन ॲण्ड टुब्रो पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत देवरुख होम प्रॉडक्ट्स कंपनीला दरवर्षी प्रमाणे या वर्षीही तीन दिवसीय दिवाळी महोत्सव प्रदर्शनमध्ये आपली प्रॉडक्ट्स विक्री करण्याची संधी मिळाली. त्यामध्ये झालेली विक्री पुढीलप्रमाणे ⟶ | १०००००/- |

# "विद्या"

* स्नेह समृध्दी मंडळ संस्थेच्या प्रकल्प विद्या अंतर्गत सन २०१७ पासून कार्यक्षेत्रातील गरीब, गरजु व होतकरु विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य करण्यात येते.
* सन २०२३/२४ मध्ये संस्थेच्या कार्यक्षेत्रातील **एकूण** ७७ विद्यार्थ्यांना रु.३,५४,७५०/- एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य करण्यात आले.
* पित्रे फाऊंडेशन देवरुख यांच्यामार्फत **"विमलताई पित्रे सुकन्या योजना"** अंतर्गत एकूण ५८ विद्यार्थी-विद्यार्थिनींना आर्थीक मदत करण्यात आली.
* संस्थेचे इतर देणगीदार **श्री.नंदकुमार प्रभुदेसाई, सौ.सुवर्णा प्रभुदेसाई, श्री.सचिन करमरकर, श्री. प्रल्हाद परदेशी, श्रीम.धनश्री हळबे व श्री.संजय दिघे** यांच्या मार्फत एकूण १९ विद्यार्थ्यांना शैक्षणिक आर्थिक सहाय्य करणेत आले.
* शिक्षणासाठी लागणाऱ्या आर्थीक बाबींसाठी खर्चाची रक्कम मिळाल्यामुळे हा प्रवास सुखकर झाल्याची प्रतिक्रीया विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी व्यक्त केली.
* शैक्षणिक सहाय्य करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांकरीता आरोग्य, कुटूंबजिवन शिक्षण, क्रिडा, करिअर विषयक मार्गदर्शन प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी करुन घेण्यात आले.

# प्रकल्प “विद्या” अंतर्गत शालेय भेटी



शिवाजी माध्यमिक विदयालय वांझोळे शाळा - मार्गदर्शक - सौ.नयन शिंदे सॉप्ट द नेक्स्ट कंपनीकडून आलेल्या सॅनिटरी नॅपकीन चे वाटप, दाखले संदर्भात चर्चा, शैक्षणिक प्रकल्प फॉर्म भरणे.

शिवाजी माध्यमिक विदयालय वांझोळे शाळा
मार्गदर्शक - सौ.सुप्रिया बेंडल
दाखले प्रकल्पाची माहिती दिली व अर्ज भरुन घेतले.



माध्यमिक विदयामंदिर ताम्हाने शाळा -

मार्गदर्श्क - सौ. नयन शिंदे  सॉप्ट द नेक्स्ट कंपनीकडून आलेल्या सॅनिटरी नॅपकीन चे वाटप, दाखले संदर्भात चर्चा, शैक्षणिक प्रकल्प फॉर्म भरणे.






न्यु इंग्लिश स्कूल वाशी

मार्गदर्शक - सौ. नयन शिंदे  सॉप्ट द नेक्स्ट कंपनीकडून आलेल्या सॅनिटरी नॅपकीन चे वाटप, दाखले संदर्भात चर्चा, शैक्षणिक प्रकल्प फॉर्म भरुन घेणे.

# प्रकल्प “विद्या” अंतर्गत विद्यार्थी कुटुंब भेट

प्रकल्प “विद्या” अंतर्गत शालेय विदयार्थ्यांच्या कुटुंबाला भेट देवून पडताळणी करताना संस्थेच्या कार्यकर्त्या नयन शिंदे, वैभव गवंडी व सुनिता माईन .






# प्रकल्प "विद्या" अंतर्गत दाखले वितरण














| संपर्क केलेल्या गावांची संख्या | संपर्क केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रत्यक्ष दाखल झालेले विद्यार्थी | प्रत्यक्ष दाखले काढलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | काढण्यात आलेल्या एकूण दाखल्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १७ | १२० | ४५ | २५ | ५४ |

# “समर्था”

स्नेह समृध्दी मंडळ संस्था “महिलांचा सर्वांगिण विकास” या ध्येय्याला अनुसरुन काम करीत असताना मुलींना त्यांच्या भावी आयुष्यात प्रगती व त्यांचे संरक्षण व्हावे यादृष्टीने संस्था प्रयत्न करीत आहे.

* संस्थेच्या कार्यक्षेत्रामधील १५ गावांमध्ये आणि वाडयांमध्ये एकूण ६७ बैठका घेण्यात आल्या.
* प्रत्येक बैठकीसाठी कमीत कमी ९ व जास्तीत जास्त ६० मुली उपस्थित होत्या.

**बैठकांमध्ये पुढील विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.**

१) युवती संघटनाचे महत्व आणि गरज यांविषयी मार्गदर्शन करणे. २) वैयक्तिक स्वच्छता आणि सॅनिटरी नॅपकिनचा उपयोग याबाबत मार्गदर्शन.३) स्वसंरक्षणाची गरज याबद्दल मार्गदर्शन. ४) वयात येताना होणारे बदल, धोके इ. मार्गदर्शन. ५) स्वत:मधील कलागुणांना वाव मिळण्यासाठी स्वत:मधील गुणदोष ओळखणे.६) पदार्थ प्रशिक्षण व माहिती देणे. ७) मोबाईलचा योग्य वापर.(सायबर क्राईम) ८) दैनंदिन जीवनात व भावी आयुष्यामध्ये काय करावं, योग्य काय अयोग्य काय.९) आपल्याला शैक्षणिक व कला कौशल्याबाबत कोणत्या संधी आहेत व त्या आपण कधी व कोणत्या पध्दतीने मिळवू शकतो. १०) कौटुंबिक शिक्षणाचे महत्व, भावी पिढी म्हणून चांगल्या वर्तणुकीचे महत्व. ११) ग्रामीण भागात राहुनही आपल्या शिक्षण, नोकरी व वैवाहिक आयुष्यात कशा पध्दतीने यशस्वी होता येवू शकते. याबाबत या बैठकांमधून मार्गदर्शन करण्यात येते.

# प्रकल्प “समर्था” अंतर्गत युवतींच्या बैठका




युवतीगटांला मार्गदर्शन करताना सौ. सुनिता माईन











सॉफ्ट द नेक्स्ट कंपनीकडून आलेल्या सॅनिटरी नॅपकीनचे विद्यार्थिनींमध्ये वाटप करताना संस्थेच्या कार्यकर्ता सौ. सुनिता माईन व सुप्रीया बेंडल








# प्रकल्प “समर्था” अंतर्गत पशिक्षण कार्यक्रम


प्रशिक्षक (SNP )कंपनीत उच्च पदावर असलेले श्री.आशिष प्रभुदेसाई यांनी रोजगार संधी उपयुक्त माहिती या विषयावर मार्गदर्शन केले



प्रशिक्षक कृषी पदविका असलेले श्री.सदानंद बोंद्रे यांनी करिअर व रोजगारसंधी या विषयावर मार्गदर्शन केले



# “राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीर” प्रात्यक्षिक व समुपदेशन






* राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम दि.१३ व १४ जुलै २०२३ रोजी आठल्ये सप्रे महाविद्यालय देवरुख येथे आयोजित करण्यात आला. यामध्ये संस्थेच्या कार्यक्षेत्रातील युवतींचा सहभाग होता. संस्थेच्या व भारतीलय स्त्री शक्तीच्या प्रतिनिधी म्हणून नयन शिंदे या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. त्यांनी युवतींना मार्गदर्शन केले.

* सायबर क्राईम, समुपदेशन, कौटुंबिक हिंसाचार कायदा, मुलींना धोके ओळखणे.

प्रात्यक्षिक – धोक्याच्या वेळी स्वत:चा बचाव करणे इ. विषयांवर तज्ञ व्यक्तींनी मार्गदर्शन केले.

* युवतींची उपस्थिती संख्या :– ९६०

## पोषण आहारवर आधारित “पोषण पंधरवडा” या कार्यक्रमामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हूणन मार्गदर्शन करताना संस्थेच्या कार्यकर्ता सौ.नयन शिंदे.








दि. ०१ एप्रिल २०२३ रोजी बेलारी या अंगणवाडीमार्फत पोषण आहारवर आधारित पोषण पंधरवडा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये बेलारी पंचक्रोशीतील अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, विद्यार्थी, शिक्षक, पालक, सरपंच आणि गटप्रतिनिधी उपस्थित होते. पोषण आहार व मुलांच्या सवयी यावर संस्थेच्या कार्यकर्ता सौ. नयन शिंदे मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या.

# संस्थेला विशेष भेट

प्रकल्प “विद्या” अंतर्गत देणगीदार मा.हळबे व नातेवाईक यांची संस्थेच्या कार्यालयाला भेट.
संस्थेला काही उपक्रमांमध्ये सहकार्य करता येईल का याबाबत चर्चा.



गौरी देशपांडे व श्रेयस गोडांबे (पुणे) - प्रसार माध्यमांद्वारे संस्थेच्या कामाची जाहिरात व्हावी याबाबत माहिती व मार्गदर्शन करण्यात आले.



प्रेरणा संस्था, मुंबई यांचे प्रतिनीधी दिप्ती, स्वप्नील आणि कशिना तसेच नेहरु युवा केंद्र रत्नागिरी यांचे खेड तालुका प्रतिनिधी संगम संतोष निकम यांनी संस्थेला भेट दिली. व संस्थेच्या सामाजिक कार्याविषयी माहिती घेतली.




प्रकल्प समर्था अंतर्गत करण्यात आलेल्या युवती गटांमधील मानसकोंड या युवतीगटातील मुलींनी खास संस्थेचे कार्यालय बघण्यासाठी भेट दिली.



# संस्था प्रतिनीधींसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, अभ्यास वर्ग व विशेष बैठकांमध्ये सहभाग

संस्थेच्या अध्यक्षा मा.श्रध्दा देशपांडे यांची पंचायत राज करीता मास्टर ट्रेनर म्हणून ट्रेनिंग घेण्यासाठी यशदा येथे हजेरी.




# संस्थेच्या अध्यक्षा मा.श्रध्दा देशपांडे यांचे तळेगाव याठिकाणी पंचायत राज ट्रेनिंग



# संस्थेच्या अध्यक्षा मा.श्रध्दा देशपांडे यांचा यशदा, राज्यस्तरीय सेमिनार मध्ये सहभाग



राष्ट्रीय स्तरावरील महिला संमेलनामध्ये संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ३० महिला व संस्थेच्या वतीने सौ. नयन शिंदे व सौ. सुप्रिया बेंडल उपस्थित होत्या. रेणुका प्रतिष्ठान, रत्नागिरी या ट्रस्ट अंतर्गत २८ जानेवारी २०२४ रोजी हे संमेलन आयोजित करण्यात आले होते.



# रेणुका प्रतिष्ठान रत्नागिरी

"कल्पवृक्षाची सावली"

रजि. नं. रत्नागिरी/००००१२१/२०१८

राधा निवास, पटवर्धनवाडी, रत्नागिरी - ४१५६१२ संपर्क क्रमांक - ९८५००६११४७/९४२०९०९८४०

## • तेजस्विनी महिला संमेलन •

### दक्षिण रत्नागिरी

प्रिय भगिनींनो,
सस्नेह नमस्कार !

ज्या देशात स्त्रीला नारायणी, शक्ती-स्वरूप, संपन्नता प्रदान करणारी म्हणून वंदनीय मानलं गेलं आहे अशा भारतभूमीत आपण जन्माला आलो हे आपलं भाग्यच. सर्वांना बरोबर घेऊन "परिपूर्ण होणे", "विकसित होणे" हे आपल्या जीवनाचे उद्दिष्ट आहे.

भारताच्या इतिहासात अशी असंख्य उदाहरणे आहेत जिथे स्त्रियांनी समाजाचे नेतृत्व तर केलेच पण अत्यंत कठीण परिस्थितीत योग्य दिशा देऊन समाजाला अध:पतनापासून सावरलं.

ज्ञान आणि विज्ञानाचे नवे मापदंड ओलांडत आपला भारत अधिक शक्तिशाली व वैभवसंपन्न होत आहे. संपूर्ण विश्वाला शांती मार्गाने चालण्यासाठी प्रवृत्त करत आहे. स्त्रियांचे सक्षमीकरण, देशाची अंतर्गत सुरक्षा, कुटुंबातील संस्कार मूल्यांची जपणूक, उमलत्या युवा पिढीचे भवितव्य ही आपल्यासमोर असणारी आव्हाने आहेत. म्हणूनच अशा विषयांवर समाजाने एकत्र येऊन विचार-विनिमय करणे आवश्यक आहे; आणि त्यातही विशेषत: विविध क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या समृद्ध अनुभवाची, अभ्यासपूर्ण मार्गदर्शनाची ओळख इतरांना करून देण्याचीही गरज आहे.

भारतातील प्रत्येक स्त्रीमध्ये कोणते न कोणते कौशल्य आहे आणि याच कलागुणांच्या आत्माविष्कारास प्रोत्साहन देण्यासाठी, स्त्रीविषयक मानसिकता समजून घेण्यासाठी, भारताचे उज्वल भविष्य घडवण्याच्या सुंदर प्रवासात आपले योगदान देण्यासाठी आपण साऱ्याजणी रत्नागिरी येथे आयोजित तेजस्विनी महिला संमेलनाच्या निमित्ताने एकत्र येऊ या.

| | |
|---|---|
| सौ. नेत्रा दिलीप राजेशिर्के | सौ. मीरा मोहन भिडे |
| संयोजिका | सहसंयोजिका |
| मोबा. ९४२२४३०८४६ | मोबा. ८९९९८४०९९७ |

टीप - संमेलन स्थान व वेळ लवकरच कळवू.








२० ऑगस्ट २०२३ ते ३० ऑगस्ट पर्यंतची १० दिवसीय 4c's कौन्सिलिंग सेंटर व भारती विदयापीठ न्यू लॉ कॉलेज पुणे आयोजित ऑनलाईन समुपदेशन कार्यशाळेमध्ये सौ. नयन शिंदे यांनी सहभाग घेतला.





# विशेष गुणगौरव



संस्थेच्या अध्यक्षा मा.श्रध्दा देशपांडे यांच्या सामाजिक कार्याचा आढावा “समाजयोगी” जग अधिक समृध्द करायला निघालेली माणसं या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

# वाचन कट्टयावर ऑनलाईन मुलाखत देताना मा.देशपांडे मॅडम




संस्थेच्या अध्यक्षा मा.श्रध्दा देशपांडे यांनी संस्थेने आजपर्यंत केलेल्या सामाजिक कार्याबद्दल थोडक्यात व उत्तम पध्दतीने मांडणी केली.

बॅंकेचे आर्थिक व्यवहार करताना जनता सहकारी बॅंकेतून आलेली १,००,०००/- रु. एवढी ज्यादा रक्कम संस्थेकडून परत करण्यात आल्यामुळे बॅंकेकडून संस्थेचे आभार मानण्यात आले.





## * संस्थेची इतर शासकीय यंत्रणांशी कार्यालयीन कामकाजासंबंधी संपर्क *

१) महिला बालकल्याण विभाग, रत्नागिरी यांच्या पत्रानुसार समुपदेशन केंद्राचा अहवाल सौ.नयन शिंदे यांनी सादर केला. यामध्ये सन २०१६/१७ पासून अहवाल, आर्थिक बाबत अहवाल, अनुदान पोच पावती इ. समावेश होते. त्याचप्रमाणे संस्थेची रेकॉर्ड नोंद तपासणी अहवाल आणि पोच याचा समावेश होता.

२) शासनाच्या जिवनोनत्ती कार्यक्रमामध्ये संस्थेचे सर्व गट म्हणजेच महिलांचे स्वयं सहाय्यता गट शासनाकडे जोडण्यात आले. फेडरेशन देखील स्थापन झाले. त्यामुळे संस्थेने सहयोग महिला फेडरेशन बंद करण्याचा निर्णय घेतला.

३) दिनांक २०/१२/२०२३ रोजी सहयोग महिला फेडरेशन संस्था विसर्जन प्रकरण रत्नागिरी मा.धर्मादाय आयुक्त रत्नागिरी येथे सौ.नयन शिंदे यांनी दाखल केले. तसेच सहयोग महिला फेडरेशनचा सन २०२२/२३ चा ऑडिट रिपोर्ट सादर करण्यात आला.

४) दिनांक २१/१२/२०२४ रोजी सुप्रीया बेंडल यांनी स्नेह समृध्दी मंडळचा सन २०२२/२३ चा ऑडिट सादर करण्यात आला.

५) दिनांक २७/०२/२०२४ रोजी स्नेह समृध्दी मंडळाचे वार्षिक बजेट चॅरिटी कमिशनला सादर करण्यात आले.

६) दिनांक १२/०३/२०२४ रोजी रत्नागिरी - मा. धर्मादाय आयुक्तांच्या सुचनेनुसार सहयोग महिला फेडरेशन ही संस्था बंदचा आदेश प्रत नियोजित फी भरुन घेण्यात आले.

७) दि.२७/०३/२०२४ - श्री.विरकर सर, पित्रे फाऊंडेशन यांना सन २०२३/२४ शै.आर्थिक सहाय्याचा अहवाल/आर्थिक तपशिल व सन २०२४/२५ करिताचा प्रस्ताव श्रावणी काबदुले यांनी मेल केले. या प्रस्तावाला पित्रे फाऊंडेशन यांच्याकडून मंजुर करण्यात आले.

# धन्यवाद